# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, परभणी

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, स्टेशनरोड, जि.प.कन्या प्रशालेसमोर, परभणी

दुरध्वनी क्रमांक : 02452-223388 ई-मेल : pddrda.pa-mah@gov.in, pddrdapbn@yahoo.co.in

जाक्र/एमएसआरएलएम/परभणी/पदभरती/ 950 /2018 दिनांक : 07/06/2018

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, परभणी मार्फत इंन्टेन्सिव्ह तालुक्यात स्वयंसहाय्यता समुहांची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमताबांधणी ई. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने (11) महिन्यांच्या कालावधीकरीता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षांतील प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinators) व सहाय्यक कर्मचा-यांची खालील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता अर्ज **http://msrlmparbhani.govbharti.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येत असुन ऑनलाईन पध्दतीने **दिनांक 09/06/2018** ते **22/06/2018** पर्यंत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव व मानधन | आरक्षण निहाय भरावयाची पदे | रकाना (3) पैकी समांतर आरक्षण | शैक्षणीक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | लेखापाल (Accountants) (मानधन रु 15000/-) (जिल्हा कक्षातील पद) | खुला -1 | -- | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी/ पदव्यु-त्तर पदवी<br>2. MSCIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण<br>3. Tally ची परिक्षा उत्तीर्ण | पदवीचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर किमान (3) वर्ष लेखाविषयक कामाचा अनुभव |
| 2 | प्रशासन सहाय्यक (Admin Assistant) (मानधन रु 15000/-) (जिल्हा कक्षातील पद) | खुला - 1 | -- | 1. कोणत्याही शाखेतील पदवी<br>2. इंग्रजी टायपींग वेग 40 wpm आणी<br>3. मराठी टायपींग वेग 30wpm परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4. MSCIT किंवा समकक्ष उत्तीर्ण | पदवीचे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर किमान (3) वर्ष प्रशासकीयं कामाचा अनुभव |
| 3 | प्रशासन/लेखा सहाय्यक (मानधन रु 15000/-) (तालुका कक्षातील पदे) | अजा - 1 | --- | 1) वाणिज्य शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपींग वेग 40WPM आणि<br>3) मराठी टायपींग वेग 30WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष व<br>5)Tally ची परिक्षा उत्तीर्ण आवश्यक | किमान 3 वर्षे प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |
| | | अज - 1 | महिला - 1 | | |
| | | विजअ - 1 | --- | | |
| | | विमाप्र - 1 | महिला - 1 | | |
| | | इमाव - 1 | --- | | |
| | | खुला - 4 | महिला - 1 | | |
| | | एकुण 09 | महिला - 3 | | |

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | अ) डाटा एंन्ट्री ऑपरेटर (मानधन रु 10000/-) (जिल्हाकक्षातील पद) | खुला - 1 | ---- | 1) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (इयत्ता 12वी)<br>2) इंग्रजी टायपींग वेग 40WPM आणि<br>3) मराठी टापपींग वेग 30WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष डाटाएंन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालक) कामाचा अनुभव. |
| | ब)डाटा एंन्ट्री ऑपरेटर (मानधन रु 10000/-) (तालुकाकक्षातील पदे) | अजा - 1 | ---- | | |
| | | अज - 1 | महिला -1 | | |
| | | विजअ - 1 | --- | | |
| | | विमाप्र - 1 | महिला -1 | | |
| | | इमाव - 1 | --- | | |
| | | खुला - 4 | महिला -1 | | |
| | | एकुण 9 | महिला -3 | | |
| 5 | प्रभाग समन्वयक (Cluster Co-ordinators) (मानधन रु 20500/-) (जिल्हा परिषद प्रभागाकरीता तालुका कक्षातील पदे) | अजा - 7 | महिला-2 | 1.पदवी परिक्षा उत्तीर्ण<br>2. BSW किंवा BSC Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG In Rural Development किंवा PG in Rural Management यापैकी शैक्षणीक अर्हता धारण करणा-यास उमेदवारास प्राधान्य राहीलं.<br>3. संगणक व लॅपटॉप हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक | पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतरचा जोखील प्रवण गट (महिला, अपंग, एससी/एसटी सह) सामाजीक प्रवर्तन व संस्थीय बांधणी विषयक कामाचा कमीतकमी (3) वर्षाचा ग्रामीण विकास, सामाजीक प्रवर्तन, गरीबी निर्मुलन, उपजिवीका विकास कार्यक्रमाचा अनुभव आवश्यक |
| | | अज - 4 | महिला-1 | | |
| | | विजअ - 2 | महिला-1 | | |
| | | भजब - 1 | ---- | | |
| | | भजक - 2 | महिला-1 | | |
| | | भजड - 1 | ---- | | |
| | | विमाप्र - 1 | ---- | | |
| | | इमाव - 10 | महिला-3, अपंग-1 | | |
| | | खुला - 26 | महिला-8, अपंग-1 | | |
| | | एकुण 54 | महिला-16,अपंग 2 | | |
| 6 | अ) शिपाई (Peon) (मानधन रु 8000/- (जिल्हाकक्षातील पद) | खुला-1 | --- | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 10वी ची परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्ष शासकीय कार्यालय/ संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव. |
| | ब) शिपाई (मानधन रु 8000/- (तालुकाकक्षातील पदे) | अजा - 1 | | | |
| | | अज - 1 | महिला -1 | | |
| | | विजअ - 1 | --- | | |
| | | विमाप्र - 1 | महिला -1 | | |
| | | इमाव - 1 | --- | | |
| | | खुला - 4 | महिला -1 | | |
| | | एकुण 9 | महिला -3 | | |

वरिल सर्व पदांसाठी किमान व कमाल वय 1 जुन 2018 या दिनांकास परिगणीत करण्यात येईल. सर्वसाधारण उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष् व कमाल 38 वर्ष तसेच मागासवर्गीय उमेदवाराचे किमान वय 18 व कमाल 43 वर्ष यापेक्षा जास्त असु नये.

Scanned by CamScanner

वरिल तक्त्यामधील क्र.(5) वगळता इतर पदाकरीता 100 गुणांची फक्त लेखी परिक्षा घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यांत येईल. लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी, संगणकज्ञान, अंकगणित व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकावर / विषयावर आधारीत राहीलं.

प्रभाग समन्वयक पदांकरीता 80 गुणांची लेखी व 20 गुणांची तोंडी परिक्षा घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यांत येईल, प्रभाग समन्वयक पदाची लेखी परिक्षा मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीकचाचणी, सामाजीक शास्त्रे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियान या घटकांवर /विषयावर आधारीत राहीलं.

**उमेदवारांना वेगवेगळया पदांसाठी वेगवेगळा अर्ज सादर करणे बंधन कारक राहीलं. तथापी एकाच वेळेस वेगवेगळया पदांची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.**

उपरोक्त सर्व पदासाठी आवश्यक सविस्तर तपशिल https://.parbhani.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे. Online अर्ज भरण्यापुर्वी उमेदवारांनी संकेतस्थळावरिल तपशिल काळजीपुर्वक वाचावा.

टिप :

1. अपंगाची पदे भरताना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक 19/03/2010 मधील सुचनेनुसार अपंगाची पदे सामाजीक प्रवर्गात दर्शविण्यांत आलेली आहेत. मात्र गुणवत्तेनुसार निवड झालेला उमेदवार ते ज्या सामाजीक प्रवर्गात असतील त्या सामाजीक प्रवर्गात समातंर आरक्षण म्हणुन सामाऊन घेण्यांत येईल. अशा परिस्थितीत जेवढी अपंगाची पदे भरण्यांत येईल त्या सामाजीक आरक्षणातील इतर पदामधुन कमी करण्यांत येईल.
2. उपरोक्त अ.क्र. (1) ते (6) मध्ये दर्शविलेल्या पदसंख्यामध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता पासुन सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.परभणी यांनी राखुन ठेवले आहेत.

**जिल्हा अभियान संचालक**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद परभणी**

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, परभणी**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, स्टेशनरोड, जि.प.कन्या प्रशालेसमोर, परभणी

दुरध्वनी क्रमांक : 02452-223388 ई-मेल : pddrda.pa-mah@gov.in, pddrdapbn@yahoo.co.in

---

1) एमएसआरएलएम / एचआर/ प्रक्र-436/949/2017 दिनांक 17/04/2017
2) शासननिर्णय क्रमांक मजिअ 2107/प्रक्र./59/योजना-3 दिनांक 07 जुलै 2017
3) मा.मु.का.अ.एमएसआरएलएम मुंबई यांचे पत्र क्र. एमएसआरएलएम / एचआर/प्रक्र/40/617/2018 दिनांक 15/03/2018
4) मा.मु.का.अ.एमएसआरएलएम मुंबई यांचे पत्र क्र. एमएसआरएलएम / एचआर/प्रक्र/41/656/2018 दिनांक 15/03/2018

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, परभणी मार्फत इंन्टेन्सिव्ह तालुक्यात स्वयंससहाय्यता समुहांची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमताबांधणी ई. कामे करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने (11) महिन्यांच्या कालावधीकरीता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक व सहाय्यक कर्मचा-यांची खालील रिक्त असलेली पदे भरण्याकरीता अर्ज http://msrlmparbhani.govbharti.in या संकतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येत असुन ऑनलाईन पध्दतीने दिनांक 09/06/2018 ते 22/06/2018 पर्यंत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख | 09/06/2018 |
| 2 | ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख | 22/06/2018 |
| 3 | परिक्षेकरीता पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्दी / याबाबतचे आक्षेप निवारण | 25/06/2018 ते 30/06/2018 |
| 3 | परिक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परिक्षेच्या 4 दिवस अगोदर संकेतस्थळावर सुरु राहील. |
| 4 | लेखी परिक्षा दिनांक | http://msrlmparbhani.govbharti.in व https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. |
| 5 | हेल्पलाईन क्रमांक | 02452-223388 |

Scanned by CamScanner

**1. उपलब्ध पदसंख्या - आरक्षणानुसार भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | जातीचा प्रवर्ग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| 1 | लेखापाल (जिल्हास्तर) | 1 | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 2 | प्रशासन सहाय्यक (जिल्हास्तर) | 1 | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 3 | प्रशासन /लेखा सहाय्यक | 9 | 1 | 1 | 1 | - | - | - | 1 | 1 | 4 | 9 |
| 4 | अ) डाटाएंन्ट्री ऑपरेटर (जिल्हाकक्ष) | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| | ब) डाटाएंन्ट्री ऑपरेटर (तालुकाकक्ष) | 9 | 1 | 1 | 1 | - | - | - | 1 | 1 | 4 | ९ |
| 5 | प्रभाग समन्वयक | 54 | 7 | 4 | 2 | 1 | 2 | 1 | 1 | 10 | 26 | 54 |
| 6 | अ) शिपाई (जिल्हाकक्ष) | 1 | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| | ब) शिपाई (तालुकाकक्ष) | 9 | 1 | 1 | 1 | - | - | - | 1 | 1 | 4 | 9 |
| | **एकुण** | **85** | **10** | **7** | **5** | **1** | **2** | **1** | **4** | **13** | **42** | **85** |

**1. समांतर आरक्षण तपशील**

| अ. क्र. | पदाचे नांव | विवरण | जातीचा प्रवर्ग | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | विजअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| 1 | लेखापाल (जिल्हास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 2 | प्रशासन सहाय्यक (जिल्हास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 3 | प्रशासन / लेखा सहाय्यक (तालुकास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | 1 | - | - | - | - | 1 | - | 1 | 3 |
| 4 | अ) डाटा एंन्ट्री ऑपरेटर (जिल्हास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | | | | | | | | | | |
| | ब) डाटा एंन्ट्री ऑपरेटर (तालुकास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | 1 | - | - | - | - | 1 | - | 1 | 3 |
| 5 | प्रभाग समन्वयक (तालुकास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 | 2 |
| | | महिला | 2 | 1 | 1 | - | 1 | - | - | 3 | 8 | 16 |
| 6 | अ) शिपाई (जिल्हास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | ब) शिपाई (तालुकास्तर) | अपंग | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | महिला | - | 1 | - | - | - | - | 1 | - | 1 | 3 |
| | **एकुण** | | **2** | **4** | **1** | **-** | **1** | **-** | **3** | **4** | **12** | **27** |

Scanned by CamScanner

**2. उमेद, MSRLM तालुकास्तरीय पदांसाठी शैक्षणीक पात्रता विषयक अटी**

| अ.क्र. | पदाचे नांव<br>दरमहा मानधन | आवश्यक शैक्षणीक अर्हता | एकुण अनुभव (किमान वर्ष) |
|---|---|---|---|
| 1 | लेखापाल<br>(जिल्हास्तर) | 1. मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी/पदव्युत्तर पदवी<br>2. MSCIT किंवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण<br>3. Tally ची परिक्षा उत्तीर्ण | पदवीचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर किमान 3 वर्ष लेखाविषयक कामाचा अनुभव |
| 2 | प्रशासन सहाय्यक<br>(जिल्हास्तर)<br>दरमहा रु 15000/- | 1.कोणत्याही शाखेतील पदवी<br>2. इंग्रजी टायपींग वेग 40 wpm आणी<br>3. मराठी टायपींग वेग 30wpm परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4. एमएससीआयटी किंवा समकक्ष | पदवीचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर किमान 3 वर्ष प्रशासकीय कामाचा अनुभव |
| 3 | प्रशासन व लेखा सहाय्यक<br>दरमहा रु 15000/- | 1) वाणिज्य शाखेतील पदवी<br>2) इंग्रजी टायपींग वेग 40WMP आणि<br>3) मराठी टायपींग वेग 30WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष<br>5) Tally ची परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक | किमान 3 वर्षे प्रशासकीय कामाचा अनुभव |
| 4 | अ) डाटा एंन्ट्री ऑपरेटर<br>(जिल्हाकक्ष)<br>ब) डाटा एंन्ट्री ऑपरेटर<br>(तालुकाकक्ष)<br>दरमहा रु 10000/- | 1) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण (इयत्ता12वी)<br>2) इंग्रजी टायपींग वेग 40WPM आणि<br>3) मराठी टापपींग वेग 30WPM परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>4) MS-CIT किंवा समकक्ष | किमान 3 वर्ष डाटाएंन्ट्री ऑपरेटर (संगणक परिचालक) कामाचा अनुभव |
| 5 | प्रभाग समन्वयक<br>(क्लस्टर कॉर्डीनेटर)<br>दरमहा<br>रु 20,500/- | 1.पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>2.BSW किंवा BSC Agriculture किंवा MSW किंवा MBA किंवा PG In Rural Development किंवा PG in Rural Management यापैकी शैक्षणीक अर्हता धारण करणा-यास उमेदवारास प्राधान्य राहीलं 3. संगणक व लॅपटॉप हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक | पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्यानंतरचा जोखीम प्रवण गट (महिला, अपंग, एससी/एसटी सह) सामाजीक प्रवर्तन व संस्थीय बांधणी विषयक कामाचा कमीतकमी 3 वर्षाचा ग्रामीण विकास, सामाजीक प्रवर्तन, गरीबी निर्मुलन, उपजिवीका विकास कार्यक्रमाचा अनुभव |
| 6 | अ) शिपाई<br>(जिल्हाकक्ष)<br>दरमहा रु 8000/- | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 10 वीची परिक्षी उत्तीर्ण केल्यानंतर किमान 3 वर्ष शासकीय कार्यालय/ संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव |
| | ब) शिपाई<br>(तालुकाकक्ष)<br>दरमहा रु 8000/- | 10 वी ची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | किमान 3 वर्ष शासकीय कार्यालय/ संस्था/कंपनी मधील कामाचा अनुभव |

3. **वयोमर्यादा : वरिल सर्व पदांसाठी किमान व कमाल वय अर्ज दिनांक 01 जुन 2018 या दिनांकास परिगणित करण्यांत येईल. सर्वसाधारण उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष व कमाल 38 वर्ष, तसेच मागासवर्गीय उमेदवाराचे किमान वय 18 व कमाल 43 वर्ष यापेक्षा जास्त असु नंये. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. त्यानुसार खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरात नमुद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.**

**3.1 अपंग उमेदवारासाठी वय :- 45 वर्षापर्यंत**

Scanned by CamScanner

**4. प्रवेशपत्र**

जाहिरात मधील नमूद पदाकरीता परीक्षा प्रवेश पत्र http://msrlmparbhani.govbharti.in या संकतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत येईल. **सदर पत्र पोस्टाने पाठविले जाणार नाही. परिक्षाच्या वेळी उमेदवारांनी प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहीलं. (उदा. आधारकार्ड, PAN कार्ड, निवडणुक ओळखपत्र, वाहनपरवाना)**

**5. परिक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :**

| अ.क्र. | पदाचे नांव | गुण |
|---|---|---|
| 1 | प्रभाग समन्वयक | लेखी परिक्षेमध्ये मराठी -14 गुण, इंग्रजी-14 गुण, सामान्यज्ञान-14गुण, बौध्दीक चाचणी-14 गुण, सामाजीक शास्त्र-14 गुण व महाराष्ट्र राज्य जीवनोन्नती अभियान- 10 गुण याप्रमाणे **(80 लेखी गुण व मुलाखत 20 गुण असे एकुण 100 गुण)** |
| 2 | 1.लेखापाल (जिल्हास्तर) 2.प्रशासन/लेखा सहाय्यक (तालुकास्तर) | मराठी- 20 गुण, इंग्रजी-20 गुण, सामान्यज्ञान -20 गुण, बौध्दीकचाचणी - 20 गुण, वाणीज्य संबंधित/ संगणकज्ञान - 20 गुण असे **एकुण 100 गुण** |
| | 3.प्रशासन सहाय्यक (जिल्हास्तर) 4. डेटाएंन्ट्री ऑपरेटर (जिल्हास्तर/तालुकास्तर) | मराठी- 20 गुण, इंग्रजी- 20 गुण, सामान्यज्ञान - 20 गुण, बौध्दीकचाचणी - 20 गुण, संगणकज्ञान - 20 गुण असे **एकुण 100 गुण** |
| | 5. शिपाई (जिल्हास्तर / तालुकास्तर) | मराठी- 25 गुण, इंग्रजी - 25 गुण, सामान्यज्ञान - 25 गुण, अंकगणीत - 25 गुण असे **एकुण 100 गुण** |
| **सुचना : वर नमुद केल्याप्रमाणे विषयांचे गुण अंदाजीत असुन प्रश्नपत्रिकांची एकुण गुण संख्या स्थिर ठेऊन विषय व विषयांचे गुण कमी अथिक होऊ शकतील याची नोंद घ्यावी.** | | |

5.1 **सदरील निवड प्रक्रीयेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारास रु 300/- तर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारास रु 200/- एवढी परिक्षा शुल्क आकारण्यांत येत असुन** उमेदवारांना सदर फिस (ऑनलाईन) भरणा करावयाची आहे. उमेदवारांनी परिक्षा शुल्क (Recruitment Fees) भरणा केल्याची पोंहच (Payment Receipt) ऑनलाईन प्राप्त झाल्याची खात्री करावी. त्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यांत येणारं नाही.

Scanned by CamScanner

5.2 लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल. वरिल पैकी प्रभाग समन्वयक (Cluster coordinator) या पदांकरीता दिनांक 15/03/2018 च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनेनुसार लेखी परिक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दीक चाचणी, सामाजीक शास्त्र व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर आधारीत 80 गुणांची लेखी परिक्षा व 20 गुणांची (मुलाखत) घेऊन गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यांत येईल. लेखापाल, प्रशासन / लेखा सहाय्यक, प्रशासन सहाय्यक, डाटाएंन्ट्री ऑपरेटर, शिपाई या पदांकरीता दिनांक 13/09/2017 च्या पत्रान्वये लेखी परिक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, भौतिक चाचणी, संगणकज्ञान, अंकगणित व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या घटकांवर आधारित याप्रमाणे 100 गुणांची लेखी परिक्षा असुन गुणाणुक्रमे उमेदवाराची निवड करण्यांत येईल.

5.3 सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय दिनांक 19/10/2007 मधील परिच्छेद क्रमांक 6(2) नुसार ज्या पदाकरीता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे, अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहीलं. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (ई.12 वी) च्या दर्जाच्या समान राहीलं.

5.4 परिक्षेचा निकाल तयार करताना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभाग, शासननिर्णय क्रमांक प्रनीमं/1215/(प्र.क्र.55/15)/13-अ दिनांक 05/10/2015 मधील निकषावर कार्यान्वित करण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरली जाईल.

**6. सर्व पदांकरीता सर्वसाधारण अटीं व शर्ती**

- उमेदवार हा महाराष्ट्रातील मुळ रहिवाशी असावा. उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याने डोमीसिअल प्रमाणत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे. डोमीसिअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.
- अनुसुचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागासप्रवर्ग यामधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे वैध असणारे नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.
- महिलांच्या आरक्षणाबाबत शासननिर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक 82/2001/मसेआ00/ प्र.क्र.415/का-2/दिनांक 25 मे 2001 मधील तरतुदीनुसार खुल्याप्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासननिर्णयात परिशिष्ट (3) मध्ये दिलेले खुल्या प्रवर्गात उन्नती व्यक्ती / गट (क्रीमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याने सक्षम प्राधिका-याचे वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच पुरेश्या प्रमाणांत महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारामधुन राखीव असलेले पद भरण्यांत येतील.
- सामान्य प्रशासन अधिसुचना क्रमांक एसआरव्हि-2000/प्र.क्र.(17/2000) 12 दिनांक 28 मार्च 2005 व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्हि-2000/प्र.क्र.17/2000/12 दिनांक 01 जुलै 2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.(अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा लागु नाही असे नमुद करून सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.)
- शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक 27 / 06 / 2018 नुसार उमेदवारास लेखी परिक्षेत किमान 45% गुण असणे आवश्यक

Scanned by CamScanner

- सामान्य प्रशासन विभागाकडील शासननिर्णय क्रमांक बीसीसी 2011 / प्र.क्र.1064/2011/ 16-ब दिनांक 12 डिसे 2011 नुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांची जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासुन (6) महिन्यांचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधिन राहुन नियुक्ती दिली जाईल. (6) महिन्यांत जात वेधता प्रमाणपत्रासाठी परिपुर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यांत येईल. नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा संबंधिताकडे सादर केल्याची पोंच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
- अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यांत येत आहे. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच त्याचे पुर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल. किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यांत येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराचा कोणत्याही प्रकारचा उजर ऐकुण घेतला जाणारं नाही.
- या जाहिरातीतील नमुद केलेल्या पदांवर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.
- शासकीय / निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिका-याची पुर्व परवानगी घेऊन अर्ज करणे बंधनकारक राहील. निवड झालेल्या उमेदवारांना सदर मुळपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.
- वेगवेगळया पदांसाठी वेगवेगळा अर्ज सादर करावा लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळया पदांची परिक्षा आली तर एकाच पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.
- अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा / कार्यालयाचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे. तरच संबंधित पदाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. तसेच त्याअनुषंगाने मानधन / वेतन मिळाल्याचा तपशील मागणी केला असता संबंधितास सादर करणे बंधनकारक राहील.
- नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र नजीकच्या काळात काढलेले असावे. (विमुक्त जाती व भटक्या जमाती / विशेष मागासप्रवर्ग / इतर मागासप्रवर्ग करीता आवश्यक ) सदर प्रमाणपत्र दिनांक 31 मार्च 2019 च्या आर्थिक वर्षापर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवाराचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेदवारांची खुल्या प्रवर्गाचे परीक्षा शुल्क भरले असेल तर त्यांचा अर्ज खुल्या प्रवर्गासाठी ग्राहय धरण्यांत येईल.
- जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शक केंद्रात नांव नोंदणी केली असली तरी देखील वरिल पदासाठी रितसर ऑनलाईन अर्ज अधिकृत संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे.
- नैसर्गीक आपत्ती व इतर अपरिहार्य कारणास्तव विहीत दिनांकास लेखी परिक्षा घेणे शक्य नसेल तर अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.परभणी हे ठरवतील त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी व मुलाखाती घेण्यांत येतील. याबाबत http://msrlmparbhani.govbharti.in व https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.
- सदर जाहिरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार पदाची संख्या, समांतर आरक्षण यात बदल

Scanned by CamScanner

करणे, परिक्षा स्थगित करणे / अंशतः बदल करणे ई. सर्व अधिकार हे अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी स्वतःकडे राखुन ठेवत आहेत.

- प्रभाग समन्वयक या पदाकरीता लेखी परिक्षेनंतर गुणाणुक्रमे मुलाखतीसाठी 1:5 या प्रमाणात उमेदवारास बोलविण्यांत येईल.
- उमेदवाराने त्याचे निवडीबाबत किंवा निवडीनंतर पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्याची निवड रद्द करण्यांत येईल.
- शासनाने विहीत केलेली शारीरीक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणुक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.
- परिक्षेस पात्र / अपात्र उमेदवारांची यादी, लेखी परिक्षेचा निकाल, प्रारुप निवड यादी, अंतीम निवड यादी व भरती प्रक्रीयेसंबंधित देण्यात येणा-या सुधारित व अद्यावत सुचना कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच http://msrlmparbhani.govbharti.in व https://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणारं नाही. याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.
- उमेदवाराने लेखी परिक्षेस, कागदपत्रे तपासणीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.
- प्रस्तुत भरती प्रक्रीयेच्या वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. तसेच सदरील प्रक्रीयेत काही बाबी नमुद करायच्या राहील्यास किंवा अनावधानाने चुकीच्या नमुद केलेल्या असल्यास त्या प्रचलित शासननिर्देशानुसार / निर्णयानुसार लागु राहीलं. जाहिराती बाबत काही शंका असल्यास त्यांनी जिल्हा अभियान व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, परभणी यांना कार्यालयीन वेळेत समक्ष भेटावे.
- परिक्षेनंतर संवर्ग निहाय उत्तर तालिका जिल्हा अभियान कक्ष, परभणीच्या माहिती फलकावर व http://msrlmparbhani.govbharti.in व http://parbhani.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.
- उत्तर तालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर आक्षेप असल्यास दोन दिवसांचे आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान परभणी यांचे कार्यालयात किंवा या कार्यालयाच्या ई-मेल आयडी pddrda.pa-mh@gov.in / pddrdapbn@yahoo.co.in यावर सादर करावेत. उशिरा प्राप्त होणा-या आक्षेपांचा विचार केला जाणारं नाही याची नोंद घेण्यांत यावी.
- जाहिरातीत नमुद अटीत बदल करणे, जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल करणे वा संपुर्ण भरती प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा अभियान व्यवस्थापक<br>महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान<br>परभणी | सह जिल्हा अभियान संचालक<br>प्रकल्प संचालक<br>परभणी | अध्यक्ष<br>**जिल्हा अभियान संचालक<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी** |

Scanned by CamScanner